Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849815

# लोकशाही आणि बदलते राजकारण

**प्रा. विकास नानासाहेब बेळगे**[1]

**प्रस्तावना :**

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असून ती स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाच्या तत्त्वांवर आधारित आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 26 नोव्हें. 1949 रोजी भारतीयांनी स्वत:चे संविधान बनवून ते स्वीकारले. हे संविधान 26 जानेवारी, 1950 रोजी लागू करण्यात आले. त्यानंतरच खऱ्या अर्थाने भारतीय लोकशाही पर्वाची सुरूवात झाली. 1951-52 साली पहिल्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. यावेळी प्रौढ मताधिकार पद्धतीचा अवलंब करण्यात आला. ज्या अनुषंगाने सर्व भारतीयांना वयाची अट पूर्ण करणाऱ्यांना मतदान करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला. त्यामध्ये जात-पात, धर्म, वंश, लिंग, शिक्षित-अशिक्षित अशी कोणतही अट न ठेवता सार्वत्रिक प्रौढमताधिकार भारतीय नागरिकांना देण्यात आला. आज भारतीय लोकशाही ही प्रगल्भ होताना दिसते. कारण भारतीय राज्यव्यस्थेत लोकशाहीला कोठेही फाटा देण्याचा प्रयत्न झाला नाही.

परंतु भारतासोबतच स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानमध्ये आजपर्यंत लोकशाही स्थिर होऊ शकलेली नाही. तिथे कोणत्याच पंतप्रधानाने आपला कालखंड पूर्ण केलेला नाही. अशा प्रकारे भारतीय लोकशाही व्यवस्था ही चांगल्या प्रकारे रूजली व पोसली आहे. तरी काही चिंताजनक बाबीही होताना दिसत आहेत.

**उद्दिष्ट्ये :**

1) भारतीय लोकशाहीचे स्वरूप अभ्यासणे.
2) भारतातील बदलत्या राजकीय परिस्थितीचा अभ्यास करणे.
3) भारतीय लोकशाही आणि राजकीय परिस्थिती यामधील समन्वय अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यात विविध संदर्भग्रंथ, विविध शासकीय

[1] आर.वाय.पी.कला महाविद्यालय विहामांडवा, ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

व खाजगी अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे, शासनाची अधिकृत संकेतस्थळे इ. दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**भारतीय लोकशाही :** आधुनिक भारतीय लोकशाहीमध्ये प्रौढमताधिकार पद्धती स्वीकारण्यात आली आहे. ज्यामध्ये वयाची 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्वच भारतीयांना मतदानाचा हक्क बजावता येतो.

भारतामध्ये प्राचीन काळापासून वेगवेगळया स्वरूपाची लोकशाही राहिलेली आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन भारतामध्ये राजेशाही असताना देखील स्थानिय स्वशासन सभा समिती आणि गणसंघाच्या माध्यमातून अस्तित्वात होती. वैदिक कालखंडामध्ये गाव आणि पंचायत स्थानिक मुद्दे सोडवण्यासाठी स्वतंत्र होती.

भारतात आधुनिक लोकशाही ही भारतीय संविधान लागू झाल्यानंतर सुरू झाली. सर्वप्रथम 1951-52 साली भारतामध्ये सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या अणि खऱ्या अर्थाने लोकशाहीची सुरूवात झाली. या लोकशाहीच्या माध्यमातून नागरिकांना अनेक अधिकार प्राप्त होत असतात. यामध्ये 1) समानतेचा हक्क 2) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करणार नाही. 3) सार्वजनिक राजेगारात समान संधी. 4) अस्पृश्यता पाळणे गुन्हा आहे. 5) पदव्या संपुष्टात आणल्या गेल्या.

या लोकशाहीची काही वैशिष्ट्ये आहेत ज्यामध्ये

1) अंतिम निर्णय घेण्याची सत्ता जनतेकडे.
2) मुक्त आणि सार्वत्रिक निवडणुका
3) सार्वत्रिक प्रौढ मताधिकार
4) व्यापक राजकीय सहभाग.
5) सत्तेचे विकेंद्रीकरण.
6) घटनात्मक कायदा आणि जन अधिकारांना केंद्रस्थान

अशा प्रकारे लोकशाहीचे काही व्यापक असे वैशिष्ट्ये आहेत.

**भारतीय लोकशाहीतील बदलत्या राजकारणाचे प्रमुख प्रवाह :**

**1) आघाड्यांचे राजकारण ते एकाही वर्चस्व :**

1990 नंतरच्या भारतीय राजकारणामध्ये कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळवता आले नाही. म्हणजेच 2014 पर्यंत मोदी सरकार सत्ते येईपर्यंत भारतीय राजकारणामध्ये आघाड्याचे राजकारण चालत होते. ज्या काँग्रेसने कधीकाळी संपूर्ण

भारताच्या राजकारणावर एकहाती सत्ता गाजवली. त्या काँग्रेस पक्षाला राजीव गांधीच्या निधनानंतर एकहाती सत्ता मिळवता आली नाही. यातूनच दोन विचारधारांना मानणाऱ्या पक्षाचे लोक एकत्र आले आणि दोन राष्ट्रीय पक्षांच्या नेतृत्वामध्ये दोन आघाड्या बनल्या. ज्यामध्ये युपीए काँग्रेस पक्षांच्या विचारधारेचे म्हणजे डावी विचारसरणीचे पक्ष यांची UPA (United Progressive Alliance) संयुक्त पुरोगामी आघाडी तर उजव्या विचारसरणीचे म्हणजे भाजप विचारधारेचे पक्ष यांची NDAC (National Democratic Alliance) राष्ट्रीय लोकशाही आघाडी असे दोन गट भारतीय राजकारणात सक्रिय झाले. ही परिस्थिती 2014 पर्यंत राहिली. 2014 साली मात्र भारतीय लोकशाही पर्वामध्ये एक चमत्कार घडला आणि काँग्रेस विरहित दुसऱ्या एखाद्या पक्षाने प्रथमच भारताच्या राजकारणात एकहाती सत्ता मिळवली हा चमत्कार श्री.नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपने करून दाखवला. लोकसभेच्या 282 जागा जिंकून एकहाती सत्ता मिळवली आणि परत एकदा एकहाती वर्चस्वाच्या राजकारणाची सुरूवात भारतीय राजकारणामध्ये झाली. जसे आघाडी राजकारणाचे काही फायदे होते. तसे काही तोटेही होते. ज्यातून सर्वांचे विचार एकूण घेण्यात येत आणि निर्णय होत. परंतु निर्णय घेण्यात दिरंगाई होत असे पण एकहाती सत्ता अस्तित्त्वात झाल्यानंतर निर्णय जलद घेण्याची आणि राबवण्याची क्षमता शासनात आली आहे.

**2) वैचारिक बदल :**

काँग्रेसच्या धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी विचारसरणीकडून भाजपाच्या नेतृत्वाखालील हिंदुत्ववादी विचारसरणीकडे केंद्रस्थान सरकले आहे. भाजप हा उजवी विचारसरणी माननारा पक्ष आहे. हा पक्ष स्वत:ला हिंदुत्वादी आणि राष्ट्रवादी म्हणून घेतो आणि त्याला अनुसरूनच ते राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपाने जनतेमध्ये स्वतची हिंदुत्ववादी आणि राष्ट्रवादी छाप निर्माण केली आहे.

या नवीन राजकीय समीकरणामध्ये जातीय समीकरणाऐवजी आता प्रबल नेतृत्त्व (Strong Leadership) आणि राष्ट्रवादाच्या मुद्यावर निवडणुका लढवल्या जात आहेत. तसेच परराष्ट्र धोरणातही काही बदल होत आहेत. अलिप्ततेच्या धोरणाकडून (Non-Alignment) धोरणाकडे संक्रमण होताना दिसत आहे. केंद्रात एकहाती सत्ता असल्याने, केंद्र-राज्य संबंधात ताण आणि आर्थिक संसाधनाच्या वाटपावरून वाद होत आहेत. असे अनेक वैचारिक बदल सद्य राजकीय परिस्थितीमध्ये झालेले दिसतात.

**3) राजकीय ध्रुवीकरण आणि आक्रमकता :**

भारताच्या सद्य राजकारणामध्ये धार्मिक, वैचारिक आणि भावनिक मुद्यांवर आधारित तीव्र ध्रुवीकरण दिसून येत आहे. विरोधी विचारसरणीबद्दल असहिष्णुता आणि आक्रमकता वाढली आहे. धार्मिक अस्मिता, सोशल मीडिया आणि

राष्ट्रवादाच्या मुद्यांवरून समाज विभागला जात आहे. ज्यामुळे सामाजिक सौहार्द आणि लोकशाही संस्थांवर ताण पडत आहे.

यामध्ये राजकारण आम्ही विरुद्ध ते (Us Vs them) अशा टोकाच्या भूमिकेकडे झुकताना दिसते आहे. धर्म आणि जातीचा वापर राजकीय फायदा साधण्यासाठी होताना दिसतो आहे. राजकीय भाषणामध्ये आणि संवादामध्ये खूप आक्रमकता दिसून येत आहे. विरोधकांना वा वैचारिक मतभेद असलेल्यांना देशद्रोही वा शत्रु मानण्याची प्रवृत्ती वाढलेली दिसते आहे. सोशल मिडियाचा वापर हा भावनिक ध्रुवीकरण करण्यासाठी होताना दिसतो आहे. या ध्रुवीकरणीय राजकारणामुळे जातीय हिंसाचार, सामाजिक अविश्वास व लोकशाही तत्त्वांवर परिणाम होताना दिसतो आहे.

भारतीय राजकारण हे विकासाच्या मुद्यांवर भावनिक आणि ध्रुवीय मुद्यांकडे वेगाने सरकत आहे.

**4) प्रादेशिक पक्षांची भूमिका :**

प्रादेशिक पक्षांची निर्मिती स्थानिक भाषा आणि स्थानिक सांस्कृतिक, भौगोलिक मुद्यांवर झालेली आपणास दिसून येते. जे स्थानिक मुद्दे राष्ट्रीय पक्षांकडून दुर्लक्षित राहिले. अशा मुद्यांसाठी आवाज उठवण्याचे काम या प्रादेशिक पक्षांनी केले. उदा. शिवसेना यांनी मराठी भाषिक वा अस्मितेचा प्रश्न उठवला. द्रमूक यांनी तमिल भाषा आणि स्थानिक सामाजिक अस्मितेचा मुद्दा उठवला. या प्रश्नांवरच हे स्थानिक पक्ष वाढले आणि राजकारणात किंगमेकरही झाले. या प्रादेशिक पक्षाची राजकीय ताकद ही कमी जास्त होत राहते. पण ते संपत नाहीत. हे स्थानिक पक्ष केंद्राच्या अमर्याद अधिकारांना आव्हान देतात आणि राज्यांच्या स्वायत्तेसाठी लढा देत असतात. आघाडी सरकारच्या काळात या प्रादेशिक पक्षांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. यामध्ये जेव्हा कोणत्याही राष्ट्रीय पक्षाला बहुमत मिळत नाही. तेव्हा या प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढते यांच्या भूमिका महत्त्वाच्या ठरतात.

या प्रादेशिक पक्षाच्या अजेंड्यावर स्थानिक विकास रोजगार आणि स्थानिक पक्ष असतात. त्या आधारावर हे पक्ष सत्तेवर वा विरोधी पक्षाची भूमिका बजावत असतात. भारतीय लोकशाहीत विविधता टिकवून ठेवण्यासाठी व सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी प्रादेशिक पक्षांची भूमिका महत्त्वाची आहे.

**पायाभूत विकास आणि कल्याणकारी योजना :**

बदलत्या राजकारणात निवडणूक जिंकण्यासाठी लाभार्थी वर्ग निर्माण करणे आणि विकास कामे करून त्याआधारे राजकारण केले जात आहे. यामध्ये सद्य राजकारणात पायाभूत विकासामध्ये विविध महामार्ग डिजिटल इंडिया अंतर्गत पंतप्रधान गतिशक्ती मास्टर प्लॅन, भारतमाला आणि सागरमाला, ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी वाढवणे, रेल्वे आणि मेट्रो

विस्ातर या योजना असून कल्याणकारी योजनामध्ये प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, प्रधानमंत्री आवास योजना, किसान सन्मान योजना, जल जीवन मिशन महिला सक्षमीकरण अशा प्रकारच्या योजना राबवल्या जात आहेत. या योजनांचा उपयोग हा राजकीय फायद्यासाठी होताना दिसतो आहे. मतदारांना खुश करण्यासाठी या योजना रबावल्या जात असल्याचे दिसून येते. ज्या आधारे निवडणूका प्रभावीत होतात.

थोडक्यात, आजचे भारतीय राजकारण हे विकास व कल्याण यांचा समतोल साधण्यावर अवलंबून आहे. यातून राजकीय फायदा जरी घेतला जात असला तरी देशाच्या दीर्घकालीन आर्थिक वाढीला गती मिळत आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय लोकशाही एका संक्रमण अवस्थेतून जात आहे. जिथे संस्थात्मक रचनेपेक्षा व्यक्तीपूजेचे राजकारण अधिक प्रभावी होताना दिसते आहे. आज जागतिक स्तरावर बरेच बदल होत आहेत. आजच्या डिजिटल काळातील लोकशाही यांचे चांगले वाईट परिणाम आज दिसत आहेत. तसेच वाढते राजकीय ध्रुवीकरण आणि बदलत्या भू-राजकीय परिसिथतीमध्ये भारताची लोकशाही मध्ये काही बदल होताना दिसत आहेत. त्यामध्ये भारताची लोकशाही आता अधिक निवडणूक केंद्रित बनली असल्याचे दिसून येते.

आज भारतीय राजकारणामध्ये समाजवादी तत्त्व थोडे मागे पडल्याचे दिसून येते आहे व आज शक्ती आणि पैशाच्या आधारावर राजकारण होताना दिसते आहे. 2014 पासून उजव्या विचारसरणीला मानणाऱ्या भाजपाची एकहाती सत्ता आली. त्यामुळे एका शक्तीशाली केंद्रसरकारची निर्मिती झाली आणि आघाडी राजकारणाचा बिमोड झाल्याचे दिसते. सद्य परिस्थितीमध्ये प्रादेशिक पक्षांची शक्ती कमी होताना दिसते आहे. ते प्रभावहिन होत आहेत. तसेच विरोधी पक्ष म्हणून एक प्रभावी काम करणारा राजकीय पक्षाचा अभाव दिसून येत आहे.

या राजकीय परिस्थितीमध्ये विरोधक कमजोर असल्याचे दिसते. कोणताही प्रभाव ते दाखवू शकत नाहीत. यामुळे सत्ताधारी पक्ष अधिक बलवान, शक्तीशाली झाल्याचे दिसते आहे.

**संदर्भग्रंथ :**

1) बदलत्या विश्वरचनेत वेध विकसित भारताचा डॉ. शैलेंद्र देवळाणकर (साकेत प्रकाशन)

2) राजकीय सिद्धांत आणि भारतीय राजकारण डॉ. वि.भा. वाचल (Suyash Book Gallery / K Sagar Publication)

3) Democracy in India निरजा गोपाल नयल (oxford university press)

4) When crime Poys : Money and Muscle in Indian Politics भिलन वैष्णव (Yole University press and Harper Collins India)

5) The Verdict : Decoding India's Elections प्रणव रॉय आणि दोराव आर. सोपारीवाला (Vintage Books / Penguin Random House India)

6) The Augmentative Indian अमर्त्य सेन

7) Sensex of Regional Parties Aku Srivastava (Prabhat Prakashan)

8) Regional Parties in India-1 Mittal Publications (Dr. Dasarathi Bhuyan)

9) Role of the Opposition in the Indian Parliament.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*